# सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**फक्त सभासदांसाठी**

सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली या बँकेची '९० वी वार्षिक सर्वसाधारण सभा' शुक्रवार, दि.१४-०८-२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता खरे क्लब हाऊस, जुना धामणी रोड, दत्तनगर, सांगली या ठिकाणी खालील कामकाजांकरिता होणार आहे. सदर सभेस आपण उपस्थित राहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) दिनांक ०७-०८-२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) मा. संचालक मंडळाने तयार केलेला दिनांक ३१ मार्च २०२६ अखेरचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व सन २०२५-२०२६ चा संचालक मंडळाच्या कामकाजाचा अहवाल स्वीकृत करणे.
३) सन २०२५-२०२६ या सालातील नफा विभागणीस मंजूरी देणे.
४) बँकेच्या सन २०२५-२०२६ या वर्षासाठी मा. वैधानिक लेखापरीक्षक यांच्याकडून आलेला दिनांक ३१-०३-२०२६ अखेरचा ऑडिट मेमोरेंडम स्वीकृत करणे व सन २०२४-२०२५ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाच्या दोष-दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम ४९ अन्वये मा.वैधानिक लेखापरीक्षकांनी बुडीत असल्याबद्दल प्रमाणित केलेली कर्ज खाती वसुलीचा हक्क अबाधित ठेवून निर्लेखीत करणे.
६) सन २०२५-२०२६ मध्ये सूट-सवलत योजने अंतर्गत व्याजामध्ये सवलत देऊन कर्ज खाती भागविली, त्याची नोंद घेणे.
७) सन २०२५-२०२६ या सालात बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांनी घेतलेल्या कर्जाची माहिती घेणे.
८) बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ मधील तरतुदी व रिझर्व्ह बँकेचे परिपत्रकास अनुसरुन आर्थिक वर्ष सन २०२६-२०२७ या वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक यांचे नेमणूकीबाबत केलेली कार्यवाही या संदर्भातील माहितीची नोंद घेणे.
९) बँकेच्या स्टाफिंग पॅटर्नला मान्यता देणे.
१०) सन २०२६-२७ चे अंदाज पत्रकाची नोंद घेणे.
११) सभासदांना प्रशिक्षण देणेबाबतचा पुढील वर्षीचा आराखडा तयार करणे.
१२) मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांची चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाचे आदेशावरून
**उल्हास विठ्ठल नायक**
मुख्य कार्यकारी अधिकारी

ठिकाण : सांगली
दिनांक : २४/०७/२०२६

**सभासदांना सूचना**

१) वार्षिक सर्वसाधारण सभेची वेळ जरी सकाळी १०.३० वा. असली तरी सर्व सभासदांनी सकाळी १०.०० वाजता उपस्थित रहावे, ही विनंती. सकाळी १०.०० ते १०.३० या वेळेत सर्व सभासदांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.
२) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदर वार्षिक सभा त्याच दिवशी वरील ठिकाणी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल व त्या सभेला गणसंख्या नसली तरी सभेचे कामकाज चालेल.
३) आपला पत्ता बदलला असल्यास नवीन पत्ता बँकेच्या प्रधान कार्यालयास त्वरित कळवावा.
४) भागधारक कंपन्या,फर्मस्, सोसायट्या इत्यादी संस्थांनी आपल्या संस्थेतर्फे वार्षिक सर्वसाधारण सभेत भाग घेऊन, प्रसंगी मतदान करण्याचा ठराव वा अधिकारपत्र बँकेकडे दि. ०४-०८-२०२६ पूर्वी पाठविल्यास सोयीचे होईल.
५) महाराष्ट्र सहकार कायदा कलम ३२ मधील तरतूदीनुसार वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषयसूचीवरील विषयासंबंधीची कागदपत्रे बँकेच्या प्रधान कार्यालयात सभासदांना दि. ३१-०७-२०२६ ते दि. ०४-०८-२०२६ या कालावधीत सुट्टीच्या दिवसाखेरीज, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यकारी अधिकारी अगर त्यांचे जागी कामकाज पाहणारे अधिकारी यांच्याकडे पाहावयास मिळतील.
६) सभासदांच्या भाग वर्गाच्या अर्जाचा विचार दि. ३१-०७-२०२६ ते दि. १४-०८-२०२६ अखेर या मुदतीत तहकूब ठेवण्यात येईल.
७) बँकेची website : www.sangliurban.bank.in वर बँकेचा ९० वा वार्षिक अहवाल दिनांक ०७-०८-२०२६ पासून प्रसिध्द करीत आहोत.